# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.02.2025** **वारःबुधवार**

---

1. दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी मतदानाला आज सकाळी 7 वाजल्यापासून सुरुवात
2. प्रयागराज इथ महकुंभमेळयात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार पवित्र स्नान
3. मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनात गेल्या 10 वर्षात भारताची मोठी प्रगती आणि
4. जलसंधारण आणि कृषी जमीनीच रक्षण याबाबत जनजागृती करण्यासाठी केंद्रसरकारतर्फे आजपासून देशव्यापी जलसंधारण यात्रा काढण्यात येणार

**निवडणूक**

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी मतदानाला आज सकाळी सात वाजता सुरुवात झाली असून संध्याकाळी 6 वाजेपर्यंत ते सुरू राहील. या निवडणुकीत विविध पक्षाचे एकंदर 699 उमेदवार रिंगणात असून 1 कोटी 56 लाखांहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून, त्यासाठी निवडणूक आयोगानं 1 लाख 80 हजारापेक्षा जास्त कर्मचारी तैनात केले आहेत. विधनसभेच्या 70 मतदार संघात एकंदर 13 हजार 766 मतदान केंद्र उभारण्यात आली असून, त्यातील 70 मतदान केंद्र संपूर्णतः महिला कर्मचारी चालवणार आहेत. प्रत्येक विधानसभा मतदार संघात एक याप्रमाणे 70 मतदान केंद्र, दिव्यांग कर्मचारी सांभाळणार आहेत. सर्व केंद्रांवर पिण्याच पाणी, व्हीलचेअर आदि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या निवडणुकीच वैशिष्ट्य म्हणजे 783 मतदार,100 वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत. लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी उत्साहाने सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात मतदान कराव अस आवाहन दिल्लीचे नायब राज्यपाल विनानी कुमार सकसेना यांनी केल आहे. दरम्यान शासकीय कामात अडथळा आणून आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल दिल्लीच्या मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाच्या नेत्या अतिशी यांच्या विरोधात गोविंदपुरी पोलिस ठाण्यात काल गुन्हा नोंदवण्यात आला.

**पंतप्रधान**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथ महकुंभ मेळयात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार असून, सकाळी 11 वाजता ते त्रिवेणी संगमावर पूजा आणि पवित्र स्नान करणार आहेत. यावेळी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान अनेक साधू संतांची भेट घेणार आहेत. तसच महकुंभमेळा परिसराची पाहणीही करणार आहेत. मागील वर्षी 13 डिसेंबर 2024 ला पंतप्रधान मोदी यांनी प्रयागराज इथ येऊन सुमारे साडेपाच हजार कोटी रुपयांच्या 167 विकास प्रकल्पांच उद्घाटन केल होत. दरम्यान, 13 जानेवारीपासून आतापर्यंत महकुंभ मेळयात 38 कोटी पेक्षा जास्त भाविकांनी पवित्र स्नान केल आहे.

**शहा-जम्मू काश्मीर**

जम्मू-काश्मीरच्या सुरक्षेसंबंधीची आढावा बैठक काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथ झाली. या बैठकीला गृहसचिव गोविंद मोहन, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गेल्या महिन्यात झालेल्या आढावा बैठकीत, केंद्रीय गृहमंत्र्यांनी सर्व सुरक्षा संस्थांना दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलता धोरण स्वीकारण्याचं आणि जम्मू-काश्मीरमधील दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी, समन्वित पद्धतीनं काम करण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये त्यांनी क्षेत्र वर्चस्व योजना आणि शून्य दहशतवाद योजना राबविण्यावर भर दिला होता. दहशतवादी घटना, घुसखोरी आणि दहशतवादी संघटनांमध्ये तरुणांची भरती, यामध्ये लक्षणीय घट झाल्याबद्दल सुरक्षा संस्थांच्या प्रयत्नांचं शहा यांनी त्या बैठकीत कौतुक केलं होतं.

**अश्विनी वैष्णव**

मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनात गेल्या 10 वर्षात भारतानं मोठी प्रगती केली असल्याची माहिती केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात त्यांनी ही माहिती दिली. देशात 2014 मध्ये केवळ दोन मोबाईल उत्पादन करणाऱ्या कंपन्या होत्या सध्या 300 हून अधिक कंपन्या मोबाइल उत्पादन करत आहेत. 2014 मध्ये मोबाईल उत्पादनाचं मूल्य 18 हजार 900 कोटी रुपये होते तर 2024 मध्ये हे मूल्य 4 लाख 22 हजार कोटी रुपये इतके झाल्याचंही त्यांनी सांगितलं. मोबाईल उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये वाढ झाल्यामुळे या क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सुमारे 12 लाख रोजगार निर्मिती झाली आहे. केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया या मोहिमेअंतर्गत आत्मनिर्भर आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन दिलं जात असल्यानं रोजगार निर्मिती होत असल्याचंही वैष्णव यांनी म्हटलं आहे.

**शिवराज सिंह**

देशभरात जलसंधारण आणि कृषी जमीनीच रक्षण याबाबत जनजागृती करण्यासाठी केंद्रसरकारतर्फे आजपासून देशव्यापी जलसंधारण यात्रा काढण्यात येणार असून त्याच उद्घाटन आज केंद्रीय कृषिमंत्री शिवरज सिंह चौहान यांच्या हस्ते होणार आहे. नवी दिल्लीत काल पत्रकार परिषदेत चौहान यांनी ही माहिती दिली. जल लाये धनधान्य अशी या यात्रेची मध्यवर्ती संकल्पना आहे. केंद्रसरकारच्या कृषि सिंचन कार्यक्रम 2 अंतर्गत ही जनजागृती यात्रा काढण्यात येत असून 60 ते 90 दिवसात 805 प्रकल्पांची माहिती देणाऱ्या फिरत्या गाड्यांद्वारे देशातल्या 26 राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील 6 हजार 673 ग्रामपंचायती मधून ही यात्रा काढण्यात येणार आहे.

**राज्यपाल**

रशियन संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे डयूमा चे अध्यक्ष व्याचेस्लाव वोलोदिन यांच्या नेतृत्वाखालील भारत दौऱ्यावर आलेल्या रशियाच्या संसदीय शिष्टमंडळाने काल महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची मुंबईतल्या राजभवन इथ सदिच्छा भेट घेतली. सशक्त राष्ट्र निर्माण होण्यासाठी राज्ये सशक्त होणे आवश्यक असल्याचं सांगून संसदीय सहकार्य राज्यस्तरावर तसंच विभाग स्तरावरही वाढवण्याच्या दृष्टीने ही भेट असल्याचं रशियन संसदेच्या अध्यक्षांनी यावेळी सांगितलं. रशियात 89 प्रांत असून, भारत रशिया व्यापार सध्याच्या 57 अब्ज डॉलर वरून 2030 पर्यंत 100 अब्ज डॉलर इतका होईल असा विश्वास वोलोदिन यांनी व्यक्त केला. आज उभय देशांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान यांसह ब्रिक्स व्यासपीठावर देखील सहकार्य वाढत आहे. उभय देशांमधील विद्यापीठांमध्ये सहकार्य वाढल्यास युवा पिढी परस्परांजवळ येईल असं राज्यपालांनी सांगितले. मुंबईजवळील वाढवण बंदर पूर्ण झाल्यावर भारत इराण रशिया व्यापार वाढेल असा विश्वास

राज्यपालांनी व्यक्त केला. यावेळी वोलोदिन यांनी राज्यपाल राधाकृष्णन आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना रशिया भेटीचं निमंत्रण दिलं.

**<u>रिझर्व्ह बँक बैठक</u>**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रा नीती समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू होत आहे. रिझर्व्ह बँकेचे नव निर्वाचित गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक होत आहे. शुक्रवारपर्यंत ही बैठक चालणार असून गव्हर्नर संजय मल्होत्रा शुक्रवारीच रिझर्व्ह बँकेचे नवीन रेपो दर जाहीर करणार आहेत. फेब्रुवारी 2023 पासून रेपो दर साडेसहा टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आले असून त्यात पाव टक्क्यांची घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**<u>साहित्य अकादमी</u>**

दिवंगत चमन अरोरा यांच्या 'एक होर अश्वत्थामा' या डोगरी भाषेतील लघुकथांच्या पुस्तकाची 2024 च्या साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची घोषणा काल संस्कृती मंत्रालयाच्या वतीने करण्यात आली. या पुस्तकाची निवड तीन सदस्यांच्या समितीने एकमताने केली आहे असं मंत्रालयानं म्हटलं आहे. ताम्रपट आणि 1 लाख रुपये असा हा पुरस्कार 8 मार्च रोजी नवी दिल्ली इथे होणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात पुरस्कार दिवंगत चमन अरोरा यांच्या कुटुंबातील सदस्याला किंवा नामांकित व्यक्तीला मरणोत्तर प्रदान केला जाणार असल्याची माहिती साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी दिली.

**<u>हत्याकांड</u>**

स्वीडन मध्ये राजधानी स्टॉकहोम जवळ 200 किलोमीटर परिसरातील ऑरेब्रो गावात एका प्रौढ शिक्षण केंद्रात काल झालेल्या गोळीबारात 10 जणांचा मृत्यू झाला. मृतकांमध्ये गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचा ही समावेश आहे स्वीडनच्या इतिहासातील ही सर्वात मोठी सामूहिक हत्या आहे अस स्वीडनचे पंतप्रधान उल्फ क्रिस्टर्सन यांनी म्हंटल आहे.

**<u>राष्ट्रीय क्रीडा</u>**

उत्तराखंडच्या डेहराडून इथे सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये 16 सुवर्णपदकांसह महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत तिसऱ्या स्थानावर कायम आहे. महाराष्ट्राच्या खात्यावर 31 रौप्य आणि 27 कांस्य पदकांसह सर्वाधिक 76 पदकं जमा झाली आहेत. काल झालेल्या वॉटर पोलोमध्ये पुरुषांच्या गटात, सर्व्हिसेस संघाने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकलं, तर महाराष्ट्राने रौप्यपदक मिळवलं; केरळला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. महिलांच्या गटात, केरळने सुवर्णपदक, आणि महाराष्ट्राने रौप्यपदक पटकावलं, आणि पश्चिम बंगालने कांस्यपदक जिंकलं. पदकतालिकेनुसार कर्नाटक राज्य 28 सुवर्णपदकांसह आघाडीवर असून सर्वहीसेस संघ 21 सुवर्णांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.